**उद्देश** : विद्यार्थी आपण पाहिलेले प्रसंग परिस्थिती आपल्या शब्दात सांगतील किंवा लिहितील.

**कृतीचे विवरण** :

1. शिक्षक मोबाईल द्वारे जत्रे विषयी चा व्हिडिओ किंवा पंढरीची वारी संबंधित व्हिडिओ पाहण्याचा गृहपाठ विद्यार्थ्यांना देणे.
2. गृहपाठ आधारित विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक 5.5 मधील प्रसंगाला अनुसरून स्वतःचे विचार आपल्या भाषाशैलीत लिहिण्यास सांगणे.
3. विद्यार्थी आपल्या भाषाशैलीत लिहितात त्यांना प्रोत्साहन देणे.

**शैक्षणिक साहित्य** : विद्यार्थी कृती हस्तपुस्तिका

**संबंधित पाठ क्रमांक** : 7,19

विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्रमांक – 5.5

**अध्ययन निष्पत्ती क्र. : 6.6**

मातृभाषेमध्ये उपलब्ध असणाऱ्या वाचन साहित्याचे वाचन करून समजून घेतात. उदा. वर्तमानपत्र, कथा, माहितीपत्रक, अंतरर्जाल बातम्या (नेटवरील बातम्या) इ. मध्ये आपल्याला आवडलेले आणि न आवडलेले विषय याबद्दल मत व्यक्त करतात आणि लिहितात.

अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :

- ❖ विद्यार्थ्यांना मातृभाषेतील उपलब्ध वाचन साहित्य पुरविणे .
- ❖ विद्यार्थ्यांनी संबंधित वाचन साहित्य वाचन करून त्याचे अर्थग्रहण करून घेणे .
- ❖ अर्थ समजून घेवून आपले मत व्यक्त करणे .
- ❖ मातृभाषेतील वाचन साहित्याच्या साधनांची ( वर्तमानपत्र, कथा, माहितीपत्रक, अंतरर्जाल बातम्या (नेटवरील बातम्या) ) माहिती होणे .

या निष्पत्ती द्वारे विध्यार्थी वाचन करून त्याचा अर्थ समजून घेण्याची सवय लावून घेतील . तसेच अर्थग्रहानानंतर आपले मत व्यक्त करतील .

**अध्ययन कृती क्र. 6.1**

**अध्ययन कृतीचे नाव** :

वर्तमानपत्रातील बातम्यांचे वाचन करणे .

**उद्देश** :

वर्तमानपत्र वाचन करून समजून घेणे .

**कृतीचे विवरण** : सुलभकाराने विद्यार्थ्यांना शाळा ग्रंथालयातील त्या दिवसाचे किंवा अगोदरचे वर्तमानपत्र देऊन त्याचे वाचन करून पाच आवडलेल्या व न आवडलेल्या बातम्यांचे शिर्षक लिहिण्यास देणे .

**शैक्षणिक साहित्य** : ग्रंथालयातील वर्तमानपत्र किंवा सबंधित दिवसाचे वर्तमान पत्र

**संबंधित पाठ क्र** : 2, 15

विद्यार्थी कृतीपुस्तिका कृतीक्रमांक : 6.1

**अध्ययन कृती क्र. 6. 2**

**कृतीचे नाव** : 'गोष्टी वाचूया – आपल्या शब्दात लिहूया '

**उद्देश** :

मातृभाषेमध्ये उपलब्ध असणाऱ्या वाचन साहित्याचे वाचन करून समजून घेणे.

**कृतीचे विवरण** :

सुलभकाराने विद्यार्थ्यांना शाळा ग्रंथालयातील उपलब्ध असलेले गोष्टीचे पुस्तक, वर्तमानपत्र, साप्ताहिक किंवा मासिक देऊन गोष्टी वाचन करून विद्यार्थ्यांना त्यांच्या शब्दात लिहिण्यास प्रोत्साहन देणे .

**शैक्षणिक साहित्य** : वर्तमानपत्र,गोष्टीचे पुस्तक ,साप्ताहिक ,मासिक किवा इत्तर साहित्य

**संबंधित पाठ क्र** : 2,6

विद्यार्थी कृतीपुस्तिका कृतीक्रमांक :6. 2

**अध्ययन कृती क्र. 6.3**

**कृतीचे नाव** : 'गोष्टी वाचूया – समजून घेवूया '

**उद्देश** :

मातृभाषेमध्ये उपलब्ध असणाऱ्या वाचन साहित्याचे वाचन करून अर्थ समजून घेणे.

**कृतीचे विवरण** :

सुलभकाने विद्यार्थ्यांना शाळा ग्रंथालयातील उपलब्ध असलेले गोष्टीचे पुस्तक, वर्तमानपत्र, साप्ताहिक किंवा मासिक देऊन गोष्टी वाचन करण्यास देणे. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास देऊन अर्थज्ञान तपासावे.

**शैक्षणिक साहित्य** : वर्तमानपत्र,गोष्टीचे पुस्तक ,साप्ताहिक ,मासिक किवा इत्तर साहित्य

**संबंधित पाठ क्र** : 6, 9 ,12

विद्यार्थी कृतीपुस्तिका कृतीक्रमांक : 6.3

**अध्ययन कृती क्र. 6.4**

**कृतीचे नाव** : माहिती पत्रकाचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहिणे .

**उद्देश** :

मातृभाषेमध्ये उपलब्ध असणाऱ्या वाचन साहित्याचे वाचन करून अर्थ समजून घेणे.

**कृतीचे विवरण** :

सुलभकाने विद्यार्थ्यांना माहिती पत्रक उपलब्ध करून देऊन त्याचे वाचन करण्यास देणे. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास देऊन अर्थज्ञान तपासावे.

**शैक्षणिक साहित्य** : माहिती पत्रक

**संबंधित पाठ क्र :** 17

विद्यार्थी कृतीपुस्तिका कृतीक्रमांक : 6.4

**अध्ययन कृती क्र. 6.5**

**कृतीचे नाव** : घटना योग्य क्रमाने लिहिणे .

**उद्देश** :

मातृभाषेमध्ये उपलब्ध असणाऱ्या वाचन साहित्याचे वाचन करून अर्थ समजून घेणे.

**कृतीचे विवरण :** सुलभकाराने विद्यार्थ्यांना काही घटनांचा क्रम बदलून देणे . विद्यार्थ्यांनी त्याचे वाचन करून समजून घेणे. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पुन्हा त्या घटना योग्य क्रमाने लावून गोष्ट तयार करणे .

**शैक्षणिक साहित्य** : पाठ्यपुस्तक , ग्रंथालयातील पुस्तके इत्यादी .

**संबंधित पाठ क्र** :17, 20,12

विद्यार्थी कृतीपुस्तिका कृतीक्रमांक : 6.5

**अध्ययन निष्पत्ती क्र. : 6.7**

भाषा शैलीकडे लक्ष देत त्या जाणून घेतात . उदा. कवितेतील यमक, लय, कथा, वाक् प्रचार, म्हणी इत्यादी.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व : क्**

1) भाषेतील गोडवा वाढविणाऱ्या यमक शब्दाबद्धल जाणून घेतील.
2) कथा म्हणजे भाषेचा "मेवाच जणू" हे जाणून घेतील.
3) दैनंदिन भाषा वापरातील वाकप्रचार जाणून घेतील.
4) विविध म्हणी जाणून त्या आपल्या बोली भाषेत वापरतील.

**अध्ययन कृती क्रं. 7.1**

**कृतीचे नाव :**"शब्दबद्धता लयीची "

**उद्देश :** विद्यार्थी यमक शब्द ओळखतील व लयीची शब्द साखळी जणून घेऊन रचतील.

**कृतीचे विवरण :**

*शिक्षक यमक युक्त गाणे गातील.

*शिक्षकांनी फलकावर गाण्यातील शब्द तारा लिहिणे व वाचन करणे.

* विद्यार्थी कृती पुस्तिका उघडून कृती क्र.7.1 मध्येदिलेली शब्द बद्धता जाणून घेण्यास सांगणे.

* विद्यार्थ्यांना शब्दबद्धता लिहिण्यास सांगून प्रेरणा देणे.

**शैक्षणिक साहित्य :** यमक संग्रह ,विविध शब्द तारा ,

**संबंधित पाठक्र :**01, 04 , 12,14 .

विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक– 7.1

**अध्ययन कृती क्रमांक–7.2**

**कृतीचे नाव :**“पद्यातील यमक गमक ”

**उद्देश :** : विद्यार्थी यमक शब्द ओळखतील व यमक शब्द जोड्या लिहितील.

**कृती विवरण-**

1) विद्यार्थ्यांचे गट करावे व गट कार्यासाठी कविता क्रमांक 1, 14 व 11 पैकी एखाद्या कवितेतील यमक शब्द लिहिण्याचे कार्य पूर्णत्वास नेणे.

2) विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक 7.2 मध्ये दिलेली ज्योत कवितेतील यमक शब्द जाणून लिहिणे.

3) इयत्ता 7 वी मधील भलरी या कवितेचे यमक शब्द सातवीतील मित्राच्या मदतीने पूर्ण करावयाचा गृहपाठ देणे.

**शैक्षणिक साहित्य :**क्रमिक पुस्तक

**संबंधित पाठ क्र :**01,04,12,14

**विद्यार्थी कृती पुस्तिका कृतीक्रमांक– 7.2**

**अध्ययन कृती क्र. :**7 .3 a

**अध्ययन कृतीचे नाव :**“कथा वाच, कथा जाण”

**उद्देश :**

विद्यार्थी कथेचे मौन वाचन करतील व कथेचा आशय आणि पात्रे समजून घेतील.

**कृतीचे विवरण** :

1) शिक्षकांनी विद्यार्थी लक्ष केंद्रित करण्यासाठी एखादी छोटीशी बोध कथा सांगावी.

2) विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक 7.3 मध्ये दिलेल्या कथेचे मौन वाचन विद्यार्थ्यांना करण्यास सांगणे.

3) मौन वाचनानंतर कथे संबंधित प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य** : ग्रंथालय पुस्तके

**संबंधित पाठ क्र** :06 आणि 20

विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक– 7.3 a

**अध्ययनकृतीक्र. :7 .3b**

**अध्ययन कृतीचे नाव** :“रचा शब्दावरून कथा”

**उद्देश** : विद्यार्थी शब्द संबंध ओळखून कथेची रचना करतील..

**कृतीचे विवरण** :

1) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक- 7.3 पाहण्यास सांगणे.

2) संबंधित शब्द वाचण्यास सांगणे व शब्द संबंध ओळखण्यास सांगणे.

उदा. खेडूत~~~~~~निरक्षर~~~~~~ चष्मा~~~~~~~~~ वाचन

शहर~~~~~वर्तमानपत्रात~~~~~~ पुस्तक~~~~~~लिहायला

दुकानदार~~~~~ वाचायला~~~~~~ शिक.

3) शब्द संबंध ओळखून कथा स्वतः रचण्यास प्रेरित करणे .

**शैक्षणिक साहित्य** :विद्यार्थी कृती पुस्तिका

**संबंधित पाठ क्र** :06 आणि 20

विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक– 7.3 b

**अध्ययन कृती क्र. :7.4 a**

**अध्ययन कृतीचे नाव** :“प्रचार--- प्रचार वाक् प्रचार ”

**उद्देश** :

विद्यार्थी दैनंदिन बोलीभाषेतील रोचक वाक् प्रचार जाणतील व बोली भाषेत उपयोग करतील.

**कृतीचे विवरण** :

1)शिक्षकांनी प्रथम वाकप्रचाराची वाक्ये आपल्या ओघवत्या भाषेत विद्यार्थ्यांना सांगणे.

2) बोललेली सर्व वाक्ये फलकावर लिहिणे.

उदा.चोर रंगेहात पकडला गेला.

3) वाक् प्रचार ओळखून लिहिण्यास सांगणे.

4) कार्य पूर्ण करणाऱ्या प्रथम पाच विद्यार्थ्यांना टाळ्यांची दाद इतरांकडून देणे.

**शैक्षणिक साहित्य** : ग्रंथालय पुस्तके

**संबंधित पाठ क्र** :06 आणि 20

विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक– **7.**4 a

**अध्ययन कृतीक्र.** :**7.**4 b

**अध्ययन कृतीचे नाव** :"उपयोगिता वाक् प्रचाराची"

**उद्देश** :सांकेतिक चित्रआधारे वाक् प्रचार ओळखण्यास सक्षम होतील.

**कृतीचे विवरण** :

चित्र दाखविणे, कृती हस्त पुस्तिका किंवा शालेय संग्रहालयातील एक नमुना विद्यार्थ्यांना दाखविणे.





विद्यार्थ्यांना चित्राआधारे वाक् प्रचार ओळखण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य** : वाक् प्रचार तक्ता , कार्डशीट पट्ट्या

**संबंधितपाठक्र** : 19 , 20

विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक– **7.**4 b

**अध्ययन कृती क्र.** : **7.5a**

**अध्ययन कृतीचे नाव** :"म्हणी मेवा"

**उद्देश :**

विद्यार्थी दैनंदिन बोली भाषेतील म्हणी समजून घेतील. .

**कृतीचे विवरण :**

*शिक्षकांनी आपल्या मोबाईलद्वारे दिलेला क्यूआर कोड वापरून विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रण मधील म्हणी ऐकविणे.

*विद्यार्थी चित्रफितीचे लक्षपूर्वक श्रवण करतात.

*विद्यार्थी कृती हस्त पुस्तिकेत ऐकलेल्या म्हणी स्मरण करून लिहितात.

*गरज भासल्यास लेखन थांबवून पुन्हा विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रण ऐकविणे.

**शैक्षणिक साहित्य** :मोबाईल ,म्हणी तक्ता.

**संबंधित पाठ क्र** :प्रसंगावधान मूल्य,व्याकरण

विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक– 5 a

**अध्ययन कृती क्र.** :7.5 b

**अध्ययन कृतीचे नाव** :“म्हणी मेवा”

**उद्देश :**

विद्यार्थी उताऱ्यातील म्हणी शोधून लिहितील.

**कृतीचे विवरण :** विद्यार्थ्यांना कृती हस्त पुस्तिकेतील कृती क्रमांक 7.5b मधील उतारा वाचण्यास सांगणे.

- उतारा वाचना नंतर उताऱ्यातील म्हणी ओळखून लिहिण्यास मार्गदर्शन करणे.

**शैक्षणिक साहित्य** :विद्यार्थी कृती पुस्तिका,म्हणी तक्ता.

**संबंधित पाठ क्र** : प्रसंगावधान मूल्य

विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक– 7.5 b

**अध्ययन निष्पती क्र. : 6. 8**

वेगवेगळ्या साहित्य प्रकारामधील साहित्यकृती वाचताना त्यातील चढ - उतार, योग्यगती व विरामचिन्हयुक्त वाचतात.

- **अध्ययन निष्पतीची व्याप्ती आणि महत्व** :
    - मुलांना विरामचिन्हांची ओखळ होते .
    - विरामचिन्हांचा योग्य तो वापर करण्यास शिकतात .
    - वाचनातील चढ – उतार समजून घेतात .
    - वाचनाची आवड निर्माण होते .

**अध्ययन कृती क्रं.8.1**

- **कृतीचे नाव** - चला उत्तरे देऊ
- **उद्देश** :
- विध्यार्थ्यांचे विराम चिन्हांविषयीचे पूर्वज्ञान तपासणे .

**कृती विवरण** :

विद्यार्थ्यांनी त्यांनी पाहिलेली चिन्हे सांगण्यास लावणे .तसेच विरामचिन्हा विषयी दिलेले प्रश्न विचारणे व त्यांची उत्तरे लिहून घेणे . सुलभकारानी वर्गामध्ये विध्यार्थ्यानी वाचलेल्या पुस्तक / गोष्टी विषयी पूर्वज्ञाना आधारित प्रश्नोत्तर विचारणे.

- **शैक्षणिक साधन** : प्रश्नावली ….चिन्हांचा तक्ता …..
- **संबंधित पाठ :**
- विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील क्र : 8.1

…………………………………………………………………………………………………

**अध्ययन कृती क्रं. 8.2**

**कृतीचे नाव** : चला उतारा वाचू

**उद्देश** : मुलांना योग्य गती ने वाचन करण्यास शिकतात .

- **कृतीचे विवरण** : मुलांच्या कडून योग्य विराम चिन्हांसहित वाचन करून घेणे . त्यांचे वाचन करतेवेळी योग्य ठिकाणी चढ – उतार देण्यास लावणे.
- **शैक्षणिक साधन :** संबधित उतारा , इतर पाठ्यपुस्तके , वाचन कात्रणे , फळांचे चार्ट,
- पालेभाज्या चार्ट
- **संबंधित पाठ : 9,11**
- विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील क्र : 8.3

**अध्ययन कृती -8.3**

- **कृतीचे नाव** : कथा वाचन
- **उद्देश** : मुलांना योग्य ठिकाणी विरामचिन्हांचे महत्व समजावणे .
- • **कृतीचे विवरण** : मुलांना दोन गटात बसवून उतारा योग्य गतीने , विरामचिन्हयुक्त वाचन करून घेणे .व दिलेला तक्ता भरून घेणे .
- **शैक्षणिक साधने** : संबंधित कथा , इतर कथा पुस्तके , कथा कार्ड शीट
- **संबंधित पाठ : 8**
- विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील क्र :8.3
- **अध्ययन कृती : 8.4**
- **कृतीचे नाव** : : “ चला कथा लिहू”
- **उद्देश** : विध्यार्थी योग्य विराम चिन्हांसहित परिच्छेद लिहिण्यास शिकतात .

**कृतीचेविवरण** :

मुलांना गटात विभागून त्यांना दिलेल्या शब्दाधारित परिच्छेद लिहिण्यास सांगणे व त्यांनी लिहिलेला परिच्छेद विरामचिन्ह युक्त आहे का ? तपासणे , योग्य श्रेणी देणे .

- **शैक्षणिक साधने** : खडू फळा , पेपर , पेन ,
- **संबंधित पाठ** : 12,14
- विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील क्र :8.4

**अध्ययन कृती : 8.5**

- **कृतीचे नाव** : विरामचिन्हे वापरूया
- **उद्देश** : विराम चिन्हांचा योग्य वापर करण्यास शिकवणे .
- **कृतीचेविवरण** :
  **विध्यार्थ्या**चे योग्य क्रमाने गट करणे . गट कार्य म्हणून विद्यार्थी कृती पुस्तकातील प्रस्तुत उताऱ्याचे योग्य विराम चिन्हयुक्त व गतीसह प्रकट वाचन करण्यास सांगणे . उताऱ्याचे वाचन करून चिन्हांची नोंद करण्यास प्रोत्साहित करणे .गट मित्रांचे वाचन कार्य पाहुन तक्त्यात नावे लिहिणे.
- **शैक्षणिक साधने** : उतारा , पाठ्यपुस्तक , पेपर ,पेन , मुल्यमापन तक्ता
- **संबंधित पाठ** :
- विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील क्र :8.5

**अध्ययन निष्पत्ती क्रमांक : 6. 9**

विद्यार्थी नवीन शब्दांच्या वापरासाठी उत्सुकता दर्शवितात आणि त्यांचा अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करतात. तसेच संदर्भानुसार शब्दांचा प्रमाणित/ बोलीभाषेत वापर करतात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :**

1) विद्यार्थ्यांमध्ये वाचन व लेखनाची आवड निर्माण करणे.

2) विद्यार्थ्यांच्या भाषाज्ञानात भर घालणे.

3) बोली भाषा आणि प्रमाणित भाषा यामधील फरक जाणून घेऊन तिचा वापर करणे.

**कृती क्रमांक** : 9.1

**अध्ययन कृतीचे नाव** : "शब्दांचा अर्थ लिहूया "

**कृतीचा उद्देश**: विद्यार्थ्यांचे शब्दभांडार वाढविणे, शब्दांचा अचूक अर्थ समजून घेणे.

**कृती विवरण** :

गटकृतीद्वारे विद्यार्थ्यांमार्फत करून घेतलेल्या शब्दकोशाचा प्रस्तुत कृतीसाठी विद्यार्थी उपयोग करतील. शब्दसंग्रह उपलब्ध नसल्यास उपलब्ध वेळेत गटकृतीद्वारे पाठ्यपुस्तकातील नवीन शब्द, समानार्थीशब्द, विरुद्धार्थीशब्द इ. शब्दांचा संग्रह तयार करून घ्यावा.

**शैक्षणिक साहित्य** : फ्लॅशकार्ड, खडू, फळा इत्यादी

**संबंधित पाठ** : इयत्ता सहावी पाठ 18

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 9.1

**अध्ययन कृतीचे क्र. 9.2**

**अध्ययन कृतीचे नाव** : 'शब्द ज्ञान वाढवूया'

**कृतीचा उद्देश**: विद्यार्थ्यांचे समानार्थी व पर्यायवाची शब्दभांडार वाढविणे.

**कृती विवरण** : गट कृतीद्वारे विद्यार्थ्यां मार्फत करून घेतलेल्या शब्दकोशाचा प्रस्तुत कृती साठी विद्यार्थी उपयोग करतील .(शब्दसंग्रह उपलब्ध नसल्यास उपलब्ध वेळेत गटकृतीद्वारे पाठ्यपुस्तकातील नवीनशब्द, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द अशा शब्दांचा संग्रह करून घ्यावा.

**शैक्षणिक साहित्य** : शब्दकोश, तक्ता, फ्लॅशकार्डइत्यादी

**संबंधित पाठ अथवा सामर्थ्य** : पाठ 14

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 9.2

**कृती क्रमांक : 9.3**

**अध्ययन कृतीचे नाव** : "थोडा प्रयत्न करूया"

**उद्देश**:

लेखनात शब्दांचा अचूक वापर करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून देणे.

**कृती विवरण** :

सदर कृती करून घेण्याआधी शिक्षकांनी शब्दांचा सुलभ अर्थ विद्यार्थ्यांना सांगावा. उदाहरण देऊन सराव करून घ्यावा.तदनंतर प्रस्तुत कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी.

**शैक्षणिक साहित्य** : खडू ,फळा ,स्केचपेन , कार्डशिट,इ

**संबंधित पाठ अथवा सामर्थ्य** : इयत्ता सहावी पाठ क्रमांक 12,14

विद्यार्थी  कार्य पुस्तिकेतील कृती  क्र :  9.3

**अध्ययन कृतीचे नाव : 9.4**

**अध्ययन कृतीचे नाव :**  "नवीन वाक्ये लिहूया "

**कृतीचा उद्देश:**  विद्यार्थ्यांना अचूक वाक्यरचना करण्याचे कौशल्य प्राप्त करून देणे.

**कृती विवरण :**

अर्थासहित शब्दांचा वाक्यात उपयोग कसा करावा याविषयी शिक्षकांनी मार्गदर्शन करावे हे अपेक्षित आहे . तदनंतर प्रस्तुत कृती करून घ्यावी.

**शैक्षणिक साहित्य :** शब्दतक्ता ,शब्दकोश इत्यादी

**संबंधित पाठ अथवा सामर्थ्य :** पाठक्रमांक 11

विद्यार्थी  कार्य पुस्तिकेतील कृती  क्र :  9.4

**अध्ययन कृतीचे नाव :  9.5**

**अध्ययन कृतीचे नाव :"** चला थोडे बोलूया "

**कृतीचा उद्देश**:  विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देणे. रचना कौशल्य दृढ करणे.

**कृती विवरण :** सदर कृती पूर्वी विद्यार्थ्यांना शिक्षकांनी मौखिक सराव अभ्यास करून घ्यावा उदाहरणे द्यावी. विद्यार्थी चुकत असल्यास मार्गदर्शन करावे. तदनंतर विद्यार्थ्यांचे मौखिक मूल्यमापन करावे.

**लागणारे शैक्षणिक साहित्य** :  शब्दतक्ता, शब्दकोश इ.

**संबंधित पाठ अथवा सामर्थ्य** : इयत्ता सहावी पाठक्रमांक 11

विद्यार्थी  कार्य पुस्तिकेतील कृती  क्र :  9.5

**अध्ययन निष्पत्ती क्र . : 6.10**

वेगवेगळ्या कला उदा. मातकाम, व्यवसाय, नृत्य कला इत्यादींना संबंधित साहित्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या भाषेबाबत आवड दर्शवितात.

**अध्ययन  निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व:**

भाषेमध्ये वेगवेगळया:व्यवसायाशी, कलेशी संबंधित वेगवेगळेशब्द, म्हणी, वाकप्रचार प्रचलित आहेत त्यांची ओळख होते. वेगवेगळे व्यवसाय कला आणि त्यांचे आपल्या जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना समजते. विविध कला व्यवसायांची आवड निर्माण होते. परस्पर सहकार्याची भावना, श्रमप्रतिष्ठा वाढीस लागते.

**अध्ययन कृती क्र .: 10.1**

**अध्ययन कृतीचे नाव** : मला ओळखतोस का ?

**उद्देश** :

व्यवसाय समजतील, व्यवसायाशी संबंधित शब्दांची ओळख करून घेतील, आपले ध्येय निश्चित करतील, आत्मविश्वास निर्माण होईल.

**कृतीचे विवरण:**

शिक्षक विद्यार्थ्यांना विविध व्यवसायाशी संबंधित चित्रे दाखवतील:. त्यानंतर त्या चित्राशी संबंधित विविध प्रश्न विचारून विद्यार्थ्यांकडून उत्तरे लिहून घेतील.

**शैक्षणिक साहित्य** : विविध व्यवसायाशी संबंधित चित्रे, तक्ते.

**संबंधित पाठ क्रमांक** : 8

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 10.1

**अध्ययन कृती क्र10..2**

**अध्ययन कृतीचे नाव :**'मी कोण होणार?'

**उद्देश :** आत्मविश्वासाने बोलतात, आपले विचार निर्भयपणे मांडतील, विविध व्यवसायाशी संबंधित वापरले जाणारे शब्द समजतील.

**कृतीचे विवरण** : शिक्षक विद्यार्थ्यांना एक उतारा वाचन करायला देतील आणि वाचन झाल्यानंतर त्यावर संबंधित प्रश्न विचारून उत्तरे घेतील.

**शैक्षणिक साहित्य** : विविध व्यवसायांची चित्रे, तक्ता, व्हिडिओ.

**संबंधित पाठ क्रमांक** : 8 माझे ध्येय

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 10.2

**अध्ययन कृती क्र . :.10.3**

**अध्ययन कृतीचे नाव :** "नाचू गाऊ".

**उद्देश** : व्यवसायाशी संबंधित कामांची माहिती होईल. विविध कलांची जाणीव होईल व त्या संबंधित शब्द समजतील.

**कृतीचे विवरण** :

शिक्षक विद्यार्थ्यांना एक अभिनयासहित गीत म्हणून दाखवतील व त्यातील विविध व्यवसायांची जाणीव करून देतील त्यानंतर रिकाम्या जागा भरून घेतील.

**शैक्षणिक साहित्य विविध:** पक्ष्यांची, प्राण्यांची चित्रे.

**संबंधित पाठ क्रमांक :** 16 व इतर

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 10.3

**अध्ययन कृती क्र .:.10.4**

**अध्ययन कृतीचे नाव :** "मातकाम"

**उद्देश** : विविध व्यवसाय आपल्याला कसे उपयोगी आहेत याची जाणीव निर्माणहोते. श्रम प्रतिष्ठा निर्माण होते, सहानुभूती निर्माण होते, परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागते.

**कृतीचे विवरण :**

शिक्षक विद्यार्थ्यांकडून एक उतारा योग्य आरोह-अवरोह सहित वाचून घेतील. त्यानंतर संबंधित प्रश्न विचारून उत्तरे घेतील.

**शैक्षणिक साहित्य** : मातीच्या वस्तूंची चित्रे, मुर्त्या इत्यादी.

**संबंधित पाठ क्रमांक :** 9

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 10.4

**अध्ययन कृती क्र10. .5**

**अध्ययन कृतीचे नाव** :'माझी आवडती कला'

**उद्देश** :विविध कला,क्रीडा विश्वाची जाणीव होते. विविध क्रीडा व कला क्षेत्रात नावाजलेल्या व्यक्तींची ओळख करून घेतात. कला जोपासतात कलेचे महत्त्व समजते .

**कृतीचे विवरण** : शिक्षक प्रथम विद्यार्थ्यांच्या पूर्व ज्ञानावर आधारित प्रश्न विचारतील. त्यानंतर विद्यार्थ्यांना एक उतारा वाचन करायला देतील आणि वर्गात चर्चा घडवून आणतील, त्यानंतर संबंधित प्रश्न विचारतील.

**शैक्षणिक साहित्य :** विविध कला क्रीडा क्षेत्रात संबंधित व्यक्तींची चित्रे, व्हिडिओ.

संबंधित पाठ क्रमांक : 16. *विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 10.4

**अध्ययन निष्पत्ती क्र. : 6.11**

**अध्ययन निष्पत्ती –**

दुसऱ्यांनी व्यक्त आलेले अनुभव तसेच दुसऱ्यांचे ऐकलेले विचार ऐकून लिहितात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :**

- दुसऱ्यांनी व्यक्त केलेले विविध अनुभव विध्यार्थी समजून घेतात.
- संवाद ऐकून आपल्या शब्दात लिहितात .
- दुसऱ्याने सांगितलेला अनुभव आपल्या शब्दात लिहितात.

❖ दुसऱ्याचे विचार ऐकून आपल्या शब्दात लिहितात.

**अध्ययन कृती क्र.** : 11.1

**अध्ययन कृतीचे नाव** : “ संवाद ऐकून आपल्या शब्दात लिहा”

**उद्देश** : संवाद ऐकून आपल्या शब्दात लिहिणे.

**कृतीचे विवरण** :

शिक्षकाने दोन विद्यार्थ्यांना संवाद देऊन तो वर्गात सादर करावा विद्यार्थ्यांनी तो विद्यार्थी कृती पुस्तिकेत आपल्या भाषेत लिहावा.

**शैक्षणिक साहित्य** : विद्यार्थी कृती हस्तपुस्तिका

**संबंधित पाठ क्र** : 02,06

विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्रमांक – 11.1.

**अध्ययन कृती क्र.** : 11.2

**अध्ययन कृतीचे नाव** : संवाद ऐकून आपल्या शब्दात लिहिणे

**उद्देश** –

विद्यार्थ्यांना स्वतःच्या भाषेत दुसऱ्यांचा संवाद लिहिता येईल.

**कृती विवरण** : शिक्षकाने विद्यार्थ्यांना विद्यार्थी कृती पत्रिकेतील कृती क्रमांक 11.2 वर दिलेली कृती वाचन करून लिहिण्यास सांगणे

**शैक्षणिक साहित्य** : विद्यार्थी कृती हस्तपुस्तिका

**संबंधित पाठ क्रमांक** : 17,19

विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्रमांक: 11.2

**अध्ययन कृती क्र.** : 11.3

**अध्ययन कृतीचे नाव** : ‘संवाद ऐकून लिहिणे’

**उद्देश:**

विद्यार्थी एखादा ऐकलेला संवाद किंवा प्रसंग आपल्या शब्दात सांगतील / लिहितील.

**कृती विवरण:**

1.शिक्षक विद्यार्थ्यांना आपल्या मोबाईलद्वारे बाजूला दिलेला क्यू आर कोड स्कॅन करून त्यातील व्हिडीओ दाखवून संवाद ऐकवतात.

2. विद्यार्थी व्हिडीओ लक्षपूर्वक ऐकतात.

3. योग्य सर्वांना नंतर विद्यार्थी हस्तपुस्तिका कृती क्रमांक 11.3 मध्ये ऐकलेल्या प्रसंगाचे लेखन आपल्या शब्द शैलीत करतात.

4. गरज भासल्यास विद्यार्थ्यांना पुन्हा ध्वनिफीत ऐकण्याची संधी देणे.

**शैक्षणिक साहित्य** : मोबाईल, विद्यार्थी कृती पुस्तक

**संबंधित पाठ क्रमांक** : 11

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्रमांक**: 11.3

**अध्ययन कृती क्र. : 11.4**

**अध्ययन कृतीचे नाव** : कल्पना करून संवाद लिहिणे

**उद्देश** :

विद्यार्थी कल्पना करून संवाद लिहितील .

**कृती विवरण** :

विद्यार्थी कृती पुस्तिकेतील कृती क्रमांक 11.4 मधील कृती विद्यार्थ्यांना कल्पना करून लिहिण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य** :विद्यार्थी कृती हस्तपुस्तिका

**संबंधित पाठ क्रमांक** :

विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्रमांक : 11.4

**अध्ययन कृती क्र. : 11.5**

**अध्ययन कृतीचे नाव** : कल्पना करून संवाद लिहिणे

**उद्देश** :

विद्यार्थी कल्पना करून संवाद लिहितील .

**कृती विवरण** :

विद्यार्थी कृती पुस्तिकेतील कृती क्रमांक 11.5 मधील कृती विद्यार्थ्यांना कल्पना करून लिहिण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य** : विद्यार्थी कृती हस्तपुस्तिका

**संबंधित पाठ क्रमांक : 9,16**

विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्रमांक : 11.5

**अध्ययन निष्पत्ती : 6.12**

वेगवेगळ्या उद्देशाच्या लिखाणानुसार विविध विषयातील लिखाणामध्ये लेखनचिन्ह, योग्य शब्द , वाक्प्रचार व म्हणी यांचा योग्य रीतीने वापर करतात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :**

- ❖ विद्यार्थी लेखन चिन्हे ओळखतात .
- ❖ लेखन करताना योग्य शब्द वापरतात .
- ❖ वाक्प्रचार अर्थ समजून वापर करतात .
- ❖ लेखन करताना योग्य ठिकाणी म्हणी वापरतात .

या अध्ययन निष्पत्तीमुळे विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याचा सर्वांगीण विकास होतो .विविध उद्धेशानुसार केलेले लेखन अधिक परिणामकारक आणि भाषाशैलीनेयुक्त होते .

**अध्ययन कृती क्र. 12.1**

**अध्ययन कृतीचे नाव** : विरामचिन्हे ओळखणे .

**उद्देश** : विद्यार्थी विरामचिन्हे ओळखतात .

**कृतीचे विवरण** : सुलभकाने विद्यार्थ्यांना उतारा देवून त्यातील विरामचिन्हे ओळखून अधोरेखित करण्यास सांगणे .

**शैक्षणिक साहित्य** : विविध उतारे , पाठ्यपुस्तकातील पाठ इत्यादी .

**संबंधित पाठ क्र** : 20, 21

विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्रमांक : 12.1

**अध्ययन कृती क्र. 12.2**

**अध्ययन कृतीचे नाव** : नाटिका सादर करणे

**उद्देश** : विद्यार्थी विरामचिन्हे ओळखतात .

**कृतीचे विवरण :**

विद्यार्थ्यांना विरामचिन्हांची पात्रे वाटून द्यावी व संवादरुपी छोटीशी नाटिका वर्गात सादर करावी . ज्यामुळे विद्यार्थ्यांना नाट्यरूपातून विरामचिन्हांची ओळख व त्यांचा वापर समजून येईल . ( प्रथम विद्यार्थ्यांना संवाद देऊन पाठांतर करून घ्यावे. प्रत्येक पात्राला आवश्यक विरामचिन्हांची आपल्या परीने वेशभूषा करावी. )

**शैक्षणिक साहित्य :** नाट्यरूपी संवाद पत्रक तसेच पात्रानुरूप वेशभूषा .

**संबंधित पाठ क्र** :19

विद्यार्थी कार्यपुस्तकातील मूल्यमापन कृती क्रमांक : 12.2

**अध्ययन कृती क्र. 12.3**

**अध्ययन कृतीचे नाव** : वाकप्रचार ओळखुया....

**उद्देश** : विद्यार्थी वाकप्रचार ओळखतात .

**कृतीचे विवरण** : शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उतारा देवून त्यातील वाक्यप्रचार ओळखून अधोरेखित करण्यास सांगणे .

**शैक्षणिक साहित्य :** विविध उतारे , पाठ्यपुस्तकातील पाठ इत्यादी .

**संबंधित पाठ क्र** :17

विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्रमांक : 12.3

**अध्ययन कृती क्र. 12.4**

**अध्ययन कृतीचे नाव :** म्हणी ओळखणे

**उद्देश :** विद्यार्थी म्हणी ओळखतात .

**कृतीचे विवरण :** शिक्षकांनी विद्यार्थ्यांना म्हणीयुक्त संवाद ऐकवावा व त्यातील म्हणी लिहून त्यांचा अर्थ लिहिण्यास द्यावा .

**शैक्षणिक साहित्य :** विविध संवाद , पाठ्यपुस्तकातील संवाद इत्यादी .

**संबंधित पाठ क्र** : 9

विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्रमांक : 12.4

**अध्ययन कृती क्र. 12.5**

**अध्ययन कृतीचे नाव** : ‘ चला पत्रलेखन करूया’

**उद्देश** :

विध्यार्थी पत्रलेखन करतात .पत्रलेखन करताना लेखन चिन्हे योग्य शब्द , म्हणी ,वाक्प्रचार यांचा वापर करतात .

**कृतीचे विवरण** : सुगमकाराने विद्यार्थ्यांना कृती पुस्तिका कृती क्र.12,5 मधील विषय देऊन पत्रलेखन करण्यास देणे.

**शैक्षणिक साहित्य :** विविध उतारे , पाठ्यपुस्तकातील पाठ इत्यादी .

**संबंधित पाठ क्र** :15

विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्रमांक : 12.5

**अध्ययन निष्पत्ती क्रं. : 6.13**

विविध प्रसंग आणि उद्देशासाठी फलकावर लिहिलेल्या सूचना, कार्यक्रमांचा अहवाल, पत्र इत्यादी जाणून घेण्याच्या उद्देशाने वाचून, अर्थपूर्ण लिहितात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :**

1) फलकावरील सूचना समजून घेतात.
2) फलक लेखन जाणून कार्यक्रमाचा अहवाल लिहितात.
3) पत्र व्यवहार किंवा पत्राला लेखी उत्तर देतात.
4) फलक लेखनाचा आशय जाणून घेतात.

**अध्ययन कृती क्र. :13.1**

**अध्ययन कृतीचे नाव :**"सुचना सांगे, आम्हा कळे"

**उद्देश :** सुचना समजून घेतीलव त्यांचे जाणिव पूर्वक पालन करतील.

**कृतीचे विवरण :**

1)शिक्षक विद्यार्थ्यांना शाळेत /वर्गात वेळोवेळी सुचना करतात ओळखून चर्चा घडवून आणतात

2) विद्यार्थी कृती हस्त पुस्तिका कृती क्र.1 मध्ये सुचनांचे लेखण स्मरून लिहिण्यास सांगणे

3 )सुचना का पाळाव्यात याविषया समजावणे व सुचनांचे महत्व लिहिणे.

**शैक्षणिक साहित्य :**विविधसुचनाफलक,भिंत्ती फलक

**संबंधित पाठ क्र :**- 14,17

विद्यार्थी कृतीपुस्तिका कृतीक्रमांक– .13.1

**अध्ययन कृती क्र. : 13.2**

**अध्ययन कृतीचे नाव :**""अहवाल सांगतो आढावा"

**उद्देश :**फलक लेखनाचा आशय जाणून कार्यक्रमाचा आहवाल समजुन आपल्या शब्दात लिहितील.

**कृतीचे विवरण :**

1)शालेय कार्यक्रम किंवा राष्ट्रीय कार्यक्रमावेळी आपण केलेल्या फलक लेखनाचा नमुना दाखवणे.

2 ) शिक्षक विद्यार्थी कृती पुस्तिका कृतीक्र.3 मधील फलक लेखन करण्यास सांगणे.

3 ) विद्यार्थ्यांकडून चित्र फलक लेखनाचा अहवाल, दिलेल्या ओळीत लेखण करण्यास सांगणे

**शैक्षणिक साहित्य :**फलक लेखन नमुने,

**संबंधित पाठ क्र :** 14,17

विद्यार्थीकृतीपुस्तिका कृतीक्रमांक– 13.2

**अध्ययन कृती क्र. :13.3**

**अध्ययन कृतीचे नाव :**"करू फलक लेखन"

**उद्देश :** फलक लेखन कर ण्याचा सराव करतील.

**कृतीचे विवरण :**

1)शिक्षक विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्र 13 .3 मधील फलक लेखन करण्यास सांगतात.

2) विद्यार्थ्यांकडून चित्र फलक लेखनाचा अहवाल, दिलेल्या ओळीत लेखण करण्यास सांगणे

3) उत्तम लेखनाला सर्वासमोर बोलावून कौतुकाची थाप द्यावी.

**शैक्षणिक साहित्य :**फलक लेखन नमुने

**संबंधित पाठ क्र :** 19

**विद्यार्थीकृतीपुस्तिका कृतीक्रमांक:** 13.3

**अध्ययन कृती क्र. :13.4**

**अध्ययन कृतीचे नाव :**"पत्र स्नेह "

**उद्देश :** पत्र वाचनाने आशय समजून घेऊन पत्राला उत्तर लिहितील

**कृतीचे विवरण :**

1)शिक्षक विद्यार्थ्याना कांही पत्र / पोष्ट कार्ड लेखन नमुने वर्गात विद्यार्थ्यांना पाहण्यास देतात.

2) विद्यार्थ्यांना विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्र.13 .4 (a ) दिलेले पत्र जाणून त्याबाबत प्रश्नं तयार करून उत्तरे लिहिण्यास सांगणे.

3)विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्र- 13.4 (b ) मध्ये दिलेल्या पत्राला उत्तर पोष्ट कार्ड उपलब्द्ध करून त्यावर लिहिण्यास सांगणे .ते कार्ड कृती पुस्तिका कृती क्र..4 (b ) मध्ये दिलेल्या जागी चिकटविण्यास लावणे.

**शैक्षणिक साहित्य :** ,पत्र व पोष्टकार्ड

**संबंधित पाठ क्र :**व्याकरण विभाग

विद्यार्थीकृतीपुस्तिका कृतीक्रमांक– 4 (a) व 4(b)

**अध्ययन कृती क्र. :13.5**

**अध्ययन कृतीचे नाव :**"जन जागृती "

**उद्देश :** फलक लेखनातून केलेल्या जागृतीचा आशय जाणून लिहिणे.

**कृतीचे विवरण :**

1)शिक्षकविद्यार्थ्यांना कांही सरकारी योजनांचे लोगो दाखविणे व आशय समजून सांगणे.

2) विद्यार्थ्यांना विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्र.5 (a ) मधील लोगो दाखवून त्याचा आशय समजून लिहिण्यास सांगणे.

3) विद्यार्थ्यांना विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्र.5 (b) विविध ठिकाणी दिलेल्या सूचना चित्र फलकांवर लिहिण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य :** ,पत्र व पोष्टकार्ड

**संबंधित पाठ क्र :**व्याकरण विभाग

विद्यार्थीकृतीपुस्तिका कृतीक्रमांक– 5 (a) व 5 (b)

**अध्ययन निष्पत्ती क्र. : 6.14**

स्वत:च्या इच्छेनुसार अथवा शिक्षकांनी दिलेल्या कृतीनुसार लेखन प्रक्रियेबद्दल जाणून घेऊन आपल्या लेखनाचे परिशोधन करतो आणि वाचकांची कल्पना जाणुन घेऊन आपल्या लिखानात योग्य तो बदल करतात . उदा . कोण्ताही प्रसंग / घटना लिहिताना. शाळा भिंतीपत्रक / मित्र - मैत्रिणीला पत्र लिहितात.

**अध्ययन निष्पत्ती व्याप्ती आणि महत्व :**

- विद्यार्थी स्वताचे विचार व्यक्त करण्यास शिकतात .
- शाळांचे भित्तीपत्रक बनविण्यास शिकतात .
- पत्र लेखन कौश्यल्य आत्मसात करतात .
- विध्यार्थ्यांची कल्पना शक्ती वृद्धिगत होते .

**अध्ययन कृती क्र . 14.1**

**कृतीचे नाव** : श्रुत लेखन करू

**उद्देश** : विध्यार्थ्यांची श्रवण शक्ती वृद्धिगत करणे .

**कृतीचे विवरण :**

मुलांना वैयक्तिकपणे दिलेल्या उताऱ्याचे श्रुत लेखन करा व नंतर मुलांच्या वह्याचे मूल्यमापन करून त्यांना योग्य मार्गदर्शन करा .

**शैक्षणिक साहित्य** : संबंधित उतारा . वाचनालयाचे कथांचे पुस्तक

संबंधित पाठ क्र : पायाभूत साक्षरता

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र : 14.1

**अध्ययन कृती क्र . 14.2**

**कृतीचे नाव :** चला मदत करुया

**उद्देश :** विध्यार्थ्यांमध्ये सहकार्य भावना वृद्धिगत करणे .

**कृतीचे विवरण :** मुलांना वैयक्तिकपणे त्यांनी केलेल्या मदती विषयी लिहिण्यास सांगणे व त्याचे वाचन करून घेणे . योग्य त्या ठिकाणी व्याकरणाविषयी मार्गदर्शन करणे .

**शैक्षणिक साहित्य :** पेपर , पेन ,खडू फळा

**संबंधित पाठ क्र :** जीवन शिक्षण मूल्य

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र : 14.2

**अध्ययन कृती क्र . 14.3**

**कृतीचे नाव :** निबंध लेखन

**उद्देश :** विध्यार्थ्यांमध्ये कल्पना शक्ती , वैचारिक दृष्टीकोन वृद्धिगत करणे .

**कृतीचे विवरण :** मुलांना वैयक्तिकपणे त्यांच्या आवडत्या विषयावर निबंध लिहिण्यास सांगणे . नंतर त्या निबंधाचे मूल्यामापन करून योग्य ते मार्गदर्शन करणे . इतर विषयावरही मुलांच्या कडून निबंध लेखन करून घेणे .

**शैक्षणिक साहित्य :** पेपर , पेन ,खडू फळा

**संबंधित पाठ क्र :** व्याकरण विभाग

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र : 14.3

**अध्ययन कृती क्र . 14.4**

**कृतीचे नाव :** पत्र लेखन

**उद्देश :** विध्यार्थ्यांमध्ये लेखन कौश्यल्य वृद्धिगत करणे .

**कृतीचे विवरण :**

मुलांना त्यांच्या आवडत्या विषयावर आपल्या नातेवाईक , मित्र व आईवडील यांना पत्र लिहिण्यास सांगणे . नंतर त्या पत्राचे मूल्यामापन करून योग्य ते मार्गदर्शन करणे . इतर विषयावरही मुलांच्या कडून पत्र लेखन करून घेणे .

**शैक्षणिक साहित्य :** पत्राचे नमुने , पत्राची कात्रणे , पेपर , पेन ,खडू फळा ,

संबंधित पाठ क्र : व्याकरण विभाग

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र : 14.4

**अध्ययन कृती क्र** – 14 .5

**कृतीचे नाव** : भित्ती पत्र लेखन

**उद्देश** : विध्यार्थ्यांमध्ये लेखन , कल्पना कौश्यल्य वृद्धिंगत करणे .

**कृतीचे विवरण** : मुलांना आपल्या वर्गातील भित्ती पत्रांचे वाचन करून .त्या पद्धतीने एखादे भित्तीपत्र तयार करण्यास लावणे व तयार केलेल्या भित्तीपात्राचे प्रदर्शन वर्गात करणे . त्याचे मूल्यमापन देखील करणे .

**शैक्षणिक साहित्य** : भित्ती पत्राचे नमुने , रंगीत पेन , कात्री . गम . पेपर , पेन ,खडू फळा ,

**संबंधित पाठ क्र** : व्याकरण विभाग

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :14-5

**अध्ययन निष्पत्ती क्रमांक.** 6. 15

**अध्ययन निष्पत्ती**

गणित, विज्ञान , समाजविज्ञान , नृत्य , चिकित्साविज्ञान ,इत्यादी विविधविषय ,उद्योग व कलेमध्ये वापरल्या जाणाऱ्या शब्दांच्या स्वरानुसार अर्थ जाणून घेऊन संदर्भ आणि अनुकूलतेनुसार लिखाणात वापर करतात.

*** अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व:**

1) विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य वाढविणे

2) विद्यार्थ्यांच्या शब्दभांडारात भर घालणे

3) संदर्भानुसार शब्दांचे अर्थ जाणून घेणे व त्यांचा योग्य वापर करणे.

**अध्ययन कृती क्रमांक** : 15.1

**कृतीचे नाव** : 'माझा शब्दसंग्रह'

**उद्देश**: साहित्यिक शब्दभांडार वाढविणे . अर्थ जाणून घेणे.

शब्दांचा अचूक अर्थ समजून घेणे.

**कृती विवरण** : एखादा पाठ विद्यार्थ्यांना वाचण्यास देऊन त्यातील नवीन शब्द लिहिण्यास सांगणे.

प्रस्तुत पाठातील जोडशब्द लेखन करणे, पाठातील विरुद्धार्थी, समानार्थी शब्दांचे लेखन करणे.

**शैक्षणिक साहित्य** : शब्द कार्ड, तक्ते

**संबंधितपाठ**: इयत्ता सहावी पाठ 18

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :15.1

**अध्ययन कृती क्रमांक : 15.2**

**कृतीचे नाव** : "अचूक शब्द निवडूया"

**उद्देश**: शब्दांचा अचूकअर्थ जाणून घेणे. शब्दांची निवड करून योग्य ठिकाणी वापर करण्याचे कौशल्य दृढ करणे.

**कृती विवरण :** विविध शब्द देऊन प्रसंगानुसार यांचा अर्थ समजावून देणे व अर्थ लिहिण्यास सांगणे, विद्यार्थ्यांनी वाक्य बनविणे ,वर्गात बोलून दाखवणे.

**शैक्षणिक साहित्य :** चित्रे, कागद, कार्डशिट, स्केचपेन इत्यादी

**संबंधितपाठ अथवा सामर्थ्य**: पाठ 15

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :15.2

**अध्ययन कृती क्रमांक : 15.3**

**कृतीचे नाव :** "पर्यायी शब्द ओळखूया"

**उद्देश**: विद्यार्थ्यांचा शब्दभांडार वाढविणे, पर्यायवाचक शब्दांचे ज्ञान वाढविणे.

**कृती विवरण :** विद्यार्थी कृतिपुस्तिका कृती क्रमांक 15.5 मध्ये दिलेल्या शब्द चौकटीतून शब्द ओळखून लिहिण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य :** तक्ता, खडूफळा,स्केचपेन, कार्डशिट इत्यादी

**संबंधितपाठ अथवा सामर्थ्य:** पाठ 16

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :15.3

**अध्ययन कृती क्रमांक : 15.4**

**कृतीचे नाव** : "अचूक वाक्य रचना करूया"

**कृतीचा उद्देश:**

विद्यार्थ्यांचे भाषाकौशल्य दृढ करणे. शब्दांचा अचूक अर्थ जाणून घेणे.

**कृती विवरण :** विद्यार्थी कृती पुस्तिका कृती क्रमांक 15.4 मधील तक्त्यात दिलेले शब्द वापरून वाक्य लिहिण्यास विद्यार्थ्यांना प्रेरित करणे.

**शैक्षणिक साहित्य :** खडू, फळा, स्केचपेन, कार्डशिट, शब्द तक्ता इत्यादी

**संबंधितपाठ:** पाठ 2

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :15.4

**अध्ययन कृती क्रमांक : 15.5**

**कृतीचे नाव :** "उतारा लेखन करूया "

**कृतीचा उद्देश**:

विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य दृढ करणे.

**कृती विवरण** : विद्यार्थ्यांना वाचन व प्रकट वाचन याबद्दल सूचना करणे.

विद्यार्थी कृतिपुस्तिका कृती क्रमांक 15.5 मध्ये दिलेला उतारा वाचन करण्यास सांगून उतारा "बाबाचे कार्य" पूर्ण करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.

**लागणारे शैक्षणिक साहित्य** :

कार्डशिट, तक्ता, स्केचपेन, खडू, फळा इत्यादी

**संबंधितपाठ अथवा सामर्थ्य:** इयत्ता सहावी पाठ 17 ,19

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :15.5

**अध्ययन निष्पत्ती : 6.16**

वाचलेले विषय आणि आपल्या दैनंदिन जीवनात स्वतःअनुभवलेले प्रसंग मिळवून त्यातून निर्माण झालेल्या भावना आणि विचार तोंडी /लेखी स्वरूपात बोली /पुस्तकी भाषेत व्यक्त करतात.

**अध्ययन निष्पत्ती ची व्याप्ती आणि महत्व :**

- स्वतः पाहिलेले प्रसंग तसेच स्वतः अनुभवलेल्या गोष्टी स्वतःच्या शब्दात निर्भीडपणे व्यक्त करता येतात.
- निसर्गामध्ये झालेले बदल तसेच समाजामध्ये होत असलेले बदल याची जाणीव निर्माण होते.
- का? कसे?कुठे?केव्हा?यासारख्या प्रश्नांची उत्तरे देण्यास असमर्थ होतात.

**अध्ययन कृती 16.1**

**अध्ययन कृतीचे नाव:** चिंबचिंब पाऊस-

**उद्देश** : स्वतः पाहिलेले व स्वतः अनुभवलेले प्रसंग स्वतःच्या शब्दात व्यक्त करता येतात.निसर्गात झालेल्या बदलांची जाणीव होते.

**कृतीचे विवरण:** शिक्षक विद्यार्थ्यांना अभिनया सहित गीत गायला सांगतील त्यानंतर पावसामुळे झालेले बदल विद्यार्थ्यांना आपल्या शब्दात सांगायला लावतील व प्रश्नांची उत्तरे घेतील.

**शैक्षणिक साहित्य** :पावसाचे चित्र, विजेचे चित्र, व्हिडिओ.

संबंधित पाठ क्र. :4

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :16.1

**अध्ययन कृती 16.2**

**कृतीचे नाव :** सण पोळ्याचा

**उद्देश** : स्वतःच्या घरात तसेच शाळेत समाजात साजरा केलेल्या सणांचे, उत्सवाचे वर्णन स्वतःच्या शब्दात व्यक्त करता यावे.

**कृतीचे विवरण:** शिक्षक विद्यार्थ्यांकडून योग्य आरोह-अवरोह सहित उतारा वाचून घेतात त्यानंतर संबंधित प्रश्न विचारतील व घरात साजरा केलेल्या सणाबद्दल विद्यार्थ्यांनाआपले विचार मांडायला सांगतील.

**शैक्षणिक साहित्य:** विविध सणांची,जत्रा याची चित्रे,व्हिडीओ,

संबंधित पाठ क्रमांक :22

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :16.2

**अध्ययन कृती क्र.16.3**

**कृतीचे नाव** : अपघात सावधान!

**उद्देश**: दैनंदिन जीवनात घडत असलेल्या बऱ्या वाईट प्रसंगी प्रसंगावधान राखून योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता वाढीस लागते.

**कृतीचे विवरण** :

शिक्षक विद्यार्थ्यांना एक अपघाताचा प्रसंग वाचायला देतात. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांनी पाहिलेल्या प्रसंगाबद्दल बोलायला प्रवृत्त करतात.

**शैक्षणिक साहित्य:** अपघाताची चित्रे, रहदारीच्या सांकेतिक चिन्हांची चित्रे.

संबंधित पाठ क्रमांक :17

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :16.3

**अध्ययन कृती,: 16.4**

**कृतीचे नाव:** “ सुषमाला पडलेले स्वप्न”

**उद्देश** : स्वतः अनुभवलेले प्रसंग स्वतःच्या शब्दात व्यक्त करता यावेत, स्वतःच्या भावना इतरांसमोर निर्भिडपणे मांडता याव्यात.

**कृतीचे विवरण** :

शिक्षक प्रथम विद्यार्थ्यांना एक उतारा वाचायला देतात आणि त्यानंतर त्यासंबंधी प्रश्न विचारून त्यांना पडलेल्या स्वप्नाबद्दल माहिती द्यायला विद्यार्थ्यांना प्रवृत्त करतील.

शैक्षणिक साहित्य: विविध चित्रे,विविध उतारे.

संबंधित पाठ :10

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :16.4

**अध्ययन कृती 16.5**

**कृतीचे नाव :** वाचा आणि वर्णन कर.

**उद्देश** :विद्यार्थ्यांना वाचलेले ऐकलेले प्रसंग स्वतःच्या शब्दात व्यक्त करता यावेत, स्वतःचे विचार आणि इतरांचे विचार यातील तारतम्य समजावे.

**कृतीचे विवरण :** शिक्षक विद्यार्थ्यांना एक उतारा वाचायला देतील आणि त्या उताऱ्यात कशाचे वर्णन केले आहे? असे विचारून त्यांच्या शब्दात अशा एखाद्या घटनेचे वर्णन करायला सांगतील.

संबंधित पाठ क्रमांक : 21

**शैक्षणिक साहित्य :** विविध उतारे, परिच्छेद.

विद्यार्थी कार्य पुस्तकातील क्र :16.5.

## संदर्भ ग्रंथ

| अ. न . | ग्रथ | प्रकाशक |
|---|---|---|
| 1 | माय मराठी पाठ्य पुस्तके | डी एस इ आर टी बेंगळूरू |
| 2 | दीक्षा पोर्टल | कर्नाटक सरकार |
| 3 | निपुण भारत | भारत सरकार |
| 4 | कृती संचिका | DIET बेळगावी |
| 5 | यु– ट्यूब वरील शैक्षणिक लिंक | यु ट्यूब |

